# मिरा भाईंदर महानगरपालिका

आस्थापना विभाग
जा.क्र.मनपा/आस्था/८६७/2020
दि.०५/१० /2020

**कार्यालयीन आदेश**

विषय :- कार्यालयीन कामकाजाबाबत..

या आदेशाव्दारे सर्व मिरा भाईंदर महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी यांना कळविण्यात येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी वर्ग कार्यालयात उशिरा येणे, कार्यालय लवकर सोडणे, ओळखपत्राचा वापर न करणे, चतुर्थ श्रेणी कामगार यांनी महापालिकेने दिलेला गणवेश परिधान न करणे अशा गंभीर बाबी निदर्शनास आलेल्या आहेत.

करिता सर्व अधिकारी/कर्मचारी वर्गाने खालील बाबींचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

1) सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळेत सोमवार ते शुक्रवार कार्यालयात उपस्थित राहावे.
2) सर्व चतुर्थ श्रेणी यांनी महापालिकेने दिलेला गणवेश परिधान करावा.
3) सर्व अधिकारी/कर्मचारी वर्गाने महापालिकेचे ओळखपत्र लावावे.
4) महानगरपालिकेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांसाठी कामकाजाची वेळ सकाळी 9.30 ते सायं 6.30 अशी आहे.

वरीलप्रमाणे दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

जे अधिकारी/कर्मचारी सदर आदेशाचे पालन करणार नाहीत त्यांचेविरुध्द कारवाई करण्यात येईल.

(डॉ. विजय राठोड, भा.प्र.से.)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
सर्व विभागप्रमुख/प्रभाग अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका
/- सर्व विभागप्रमुख/प्रभाग अधिकारी यांनी आपल्या अधिनस्त असलेल्या कर्मचाऱ्यांना अवगत करावे.